सुधारित वेळापत्रक

महाराष्ट्र शासन

अतितात्काळ/फॅक्सने

क्रमांक:- संकीर्ण-२००९/(४२८/२० ९)/माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २९ एप्रिल, २००९.

प्रति,
संचालक,
महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई.

संचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

विषय :- "Preparing Schools for Accreditation" या विषयासंदर्भात नॅबेट ॲक्रेडीटेड प्रशिक्षण कार्यक्रमाचे अधिका-यांकरिता आयोजन.

कृपया सोबतचे कार्यकारी संचालक, एज्युकेअर यांचे दि.२१-४-२००९ चे पत्र पहावे.

२. उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्याचे आदेश आहेत की, शाळेचे मूल्यांकन व प्रमाणिकीकरण याकरिता विभागातील अधिका-यांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम दि.४ ते १६ मे या कालावधीत आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाकरिता विभागीय शिक्षण उपसंचालक, एक सहाय्यक संचालक, त्या विभागातील सर्व संबंधीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व शिक्षणाधिकारी ((प्राथमिक) यांनी उपस्थित रहावयाचे आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रम हा कौन्सिल ऑफ इंडिया व नॅबेट पुरस्कृत असून या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झाल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र देखील नॅबेटतर्फे दिले जाणार आहे.

२. सदर प्रशिक्षणाचा कार्यक्रम हा एससीईआरटी पुणे येथे आयोजित करण्यात आला असून या प्रशिक्षणास सहभागी होणा-या अधिका-यांकरिता निवास व भोजन आदिंची व्यवस्था एससीईआरटीमार्फत करावयाची आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता प्रति व्यक्ति रु.४०००/-इतके प्रशिक्षण शुल्क आकारण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता येणारा संपूर्ण खर्च हा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेकडे [illegible] असलेल्या सर्व शिक्षा अभियान अंतर्गत असलेल्या निधीमधून मंजूर करण्यात यावा. सदर कार्यक्रमाची [illegible] पुढीलप्रमाणे ठरविण्यास अर्जी आहे.-

| बॅच क्रमांक | विभाग व अधिका-यांबाबतचा तपशील | | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पुणे विभाग :- | पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक व एक सहाय्यक संचालक तसेच पुणे विभागांतर्गत असलेले सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) | ४, ५ व ६ मे, २००९ |
| | नाशिक विभाग:- | नाशिक विभागीय शिक्षण उपसंचालक व एक सहाय्यक संचालक तसेच नाशिक विभागांतर्गत असलेले सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) | ४, ५ व ६ मे, २००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | मुंबई विभाग :- | मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई, व एक सहाय्यक संचालक व मुंबई विभागांतर्गत असलेले सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) तसेच महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयातील उपसंचालक. | ७, ८ व ९ मे, २००९ |
| | कोल्हापूर विभाग | कोल्हापूर विभागीय शिक्षण उपसंचालक व एक सहाय्यक संचालक तसेच कोल्हापूर विभागांतर्गत असलेले सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) | ७, ८ व ९ मे, २००९ |
| ३ | औरंगाबाद विभाग :- | औरंगाबाद विभागीय शिक्षण उपसंचालक व एक सहाय्यक संचालक तसेच औरंगाबाद विभागांतर्गत असलेले सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) | ११, १२ व १३ मे, २००९ |
| | लातूर विभाग:- | लातूर विभागीय शिक्षण उपसंचालक व एक सहाय्यक संचालक तसेच लातूर विभागांतर्गत असलेले सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) | ११, १२ व १३ मे, २००९ |
| ४ | अमरावती विभाग:- | अमरावती विभागीय शिक्षण उपसंचालक व एक सहाय्यक संचालक तसेच अमरावती विभागांतर्गत असलेले सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) | १४, १५ व १६ मे, २००९ |
| | नागपूर विभाग:- | नागपूर विभागीय शिक्षण उपसंचालक व एक सहाय्यक संचालक तसेच नागपूर विभागांतर्गत असलेले सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) | १४, १५ व १६ मे, २००९ |

३. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास सर्व अधिका-यांनी उपस्थित रहावे व प्रशिक्षण कार्यक्रमा संदर्भातील अभिप्राय हे शासनास आठ दिवसाच्या आत सादर करावेत. प्रशिक्षण कार्यक्रमास उपरोक्त नमूद केलेल्या अधिका-यांनी संपूर्ण ३ दिवस उपस्थित रहाणे आवश्यक असून जर कोणत्या कारणास्तव ते उपस्थित राहू शकणार नसतील तर त्याबद्दलची कारणे लेखी स्वरुपात देण्यात यावीत. अपरिहार्य कारणास्तव प्रशिक्षणास उपस्थित रहाणे शक्य नसेल तर त्यांच्या ऐवजी अन्य इच्छुक व जबाबदार अधिका-यास पाठविण्यात यावे. जर अपरिहार्य कारणांमुळे नियोजित वेळेपत्रकानुसार अधिका-यांना प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित रहाणे शक्य नसेल व अन्य बॅचमध्ये सहभागी व्हावयाचे असेल तसेच क्षेत्रीय कार्यालयांमधून अन्य अधिका-यांना प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी व्हावयाचे असेल तर तसे श्री.विलास कुलकर्णी, कार्यकारी संचालक, एज्युकेअर यांना कळविण्यात यावे. क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडियाच्या नियमानुसार सदर प्रशिक्षण कार्यक्रमास सहभागी होणा-यांची कमाल संख्या प्रति बॅच २४ इतकी राहील.

४. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता सर्व आवश्यक तांत्रिक बाबींची सोय एससीईआरटीमार्फत कॉन्फरन्स् हॉल, प्रोजेक्टर आदिंची सोय उपलब्ध करुन देण्यात यावी. प्रशिक्षण कार्यक्रम संदर्भातील अधिक माहिती श्री.विलास कुलकर्णी, कार्यकारी संचालक, एज्युकेयर यांचेकडून घेण्यात यावी. त्यांचा दूरध्वनी क्र.०९४२२२०६९२६ असा आहे.

५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना कळविण्यात येते की, या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत त्यांनी तातडीने विभागांतर्गत असलेल्या सर्व शिक्षणाधिका-यांना सूचित करावे. या प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता शिक्षण संचालक (प्राथमिक) कार्यालयातील श्री.शिंत्रे (दूरध्वनी क्र. ० ९ ३ ७ २ ४ ५ ५ २ ५ ८ ) व शिक्षण संचालक (माध्यमिक) कार्यालयातील श्री.मिलींद देशमुख (दूरध्वनी क्र. ०९४२३०११६८९ ) यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात येत असून प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित करण्याबाबतची सर्व दक्षता घेण्यात यावी. श्री.विलास कुलकर्णी व श्रीमती संगिता गोळे, एज्युकेअर यांची प्रशिक्षण कालावधीत निवासाची व्यवस्था एससीईआरटीमध्ये करण्यात यावी.

(डॉ.सुवर्णा सि. खरात)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:-

शिक्षण संचालक (माध्यमिक) व शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) जि.प.
श्री.विलास कुलकर्णी, कार्यकारी संचालक, एज्युकेअर.